# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/११/२०१६

**१) अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/११/२०१६ रोजी १२.०० वा दर. यातील फिर्यादी याची अल्पवयीन मुलगी हीला यातील आरोपीने लग्नाचे आमिष देऊन फुस लावुन घेवुन गेल्याने फिर्यादीने आरोपीवर संशय दर्शविल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६६(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) २ कॅमेरे ट्रॅपची चोरी . :—**

दिनांक ११/११/२०१६ रोजी १६.०० वा. यातील कोरंभी बिटातील वनक्षेत्र क्र. २१९ मध्ये लावलेले २ कॅमेरे ट्रॅप कि. १०,०००/—रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी दिनेश तेजराम नंदेश्वर वय ३९ वर्ष, रा. विठ्ठल गुजरी वार्ड पवनी वनक्षेत्र सहा कार्या पवनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. ;—**

दिनांक १७/११/२०१६ रोजी ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी हा पत्नी हेमलता कापगते वय २५ वर्ष, हीचे सोबत मोटार सायकलने जात असता यातील आरोपी क्र. ०१ ने त्यांना थाबवुन आरोपी क्र. ०२ ते ०४ यांना घरुन बोलावुन संगनमत करुन फिर्यादीला तुझ्या भावाने आमचे मुलीला फसवुन तिचे सोबत लग्न केले. फिर्यादी व त्याचे पत्नीला थापडबुक्याने मारहान करुन सार्वजनिक ठिकाणी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी धनराज विश्वनाथ कापगते वय ३२ वर्ष, रा. विर्शी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०४,५०६,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १६/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९० प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस, अवैध प्रवासी ०४ व ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.